# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : ५०९/२०२१/नाशिक**

१ डॉ.सुनिल पुंजाराम भडांगे, : तक्रारदार
रा.श्री.गणेश अपार्टमेंटच्या बाजूला,
गांध्रे रोड, शिवाजी नगर, वाडा,
ता.वाडा, जि.पालघर-४२१३०३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, नांदगाव,
ता.नांदगाव, जि.नाशिक

**ऑनलाईन सुनावणी दिनांक - ०८/०७/२०२२**

तक्रारदार यांनी दिनांक ०६/०९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ०८/०७/२०२२ रोजी meet.google.com/mcz-qvux-hgn या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीशी संबंधित सर्व पक्षकार उपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक ०६/०९/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०९/०१/२०१९ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १२९७/२०१९/नाशिक, दिनांक १४/०५/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नांदगाव, श्री.मरकड आर.एन. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९/०१/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी." तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर दुर्लक्ष व टाळाटाळ केली असल्याचे सदर तक्रार अर्जात नमूद केले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक १२९७/२०१९/नाशिक, दिनांक १४/०५/२०२१ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन तक्रारदारास दिनांक ०१/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती देता येणार नाही, असे कळविले असल्याचे नमूद केले.

सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक १२९७/२०१९/नाशिक, दिनांक १४/०५/२०२१ रोजीच्या

पारित आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. तसेच सुनावणीदरम्यान तक्रारदार यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. त्यामुळे द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नांदगाव, श्री.आर.एन.मरकड यांनी आयोगाकडील द्वितीय अपील क्रमांक १२९७/२०१९/नाशिक, दिनांक १४/०५/२०२१ रोजीच्या पारीत आदेशास अनुसरुन माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) वरील निर्देशासह प्रस्तुत तक्रार क्रमांक ५०९/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री.आर.एन.मरकड (द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी) निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नांदगाव, ता.नांदगाव, जि.नाशिक.

---

क्र.रामाआ-नाशिक/तक्रार क्र.५०९/२०२१/नाशिक/ओ- 2098 दिनांक- 20/09/2022